**एमएचटीएच-१२००४८४९२०२२**

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : २५/०७/२०२२ |
| नोंदणी तारीख | : २५/०७/२०२२ |
| निकाल तारीख | : ११/०८/२०२५ |
| कालावधी | : वर्ष महिना दिवस<br>०३ ०० १७ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क. स्तर, बेलापुर, नवी मुंबई यांच्या न्यायालयात**
**{ पिठासीन अधिकारी श्री. भारत एस. गायकवाड }**

( दि.११ ऑगस्ट, २०२५ रोजी घोषीत )

**नियमित फौजदारी खटला क्र.१००४/२०२२** **निशाणी क्र.१५**

( पोलिस ठाणे तुर्भे येथील गुन्हा नोंद क्र. ८४/२०२२, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वये )

**भाग-अ**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष / फिर्यादी | : | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे तुर्भे, नवी मुंबई.<br>फिर्यादी : शिवाजी तेजप्पा पुटके<br>वय : सज्ञान, धंदा : बिगारीकाम,<br>रा. : तुर्भे स्टोअर, नवी मुंबई. |
| सादरकर्ते | : | श्रीमती. होळकर, सहा. सरकारी अधिवक्ता,<br>सरकार पक्षातर्फे |
| आरोपी क्र.१ | : | प्रथमेश परमेश्वर पुटके<br>वय : २२ वर्षे, व्यवसाय : नोकरी,<br>रा. : रूम क्र.३६, डॉ. गोसावी<br>दवाखान्याशेजारी, बाबा गल्ली,<br>तुर्भे स्टोअर, नवी मुंबई. |
| सादरकर्ते | : | विधिज्ञ श्री. बी. बी. वाघमारे |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २९/०३/२०२२ |
| फिर्याद दाखल तारीख | ३०/०३/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २५/०७/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २७/०३/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | २८/०४/२०२५ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | २८/०७/२०२५ |
| निकालाची तारीख | २८/०७/२०२५ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर | -- |

**आरोपींचे विवरण**

| आरोपींचे अ.क्र. | आरोपींचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ साठी खटला सुरू असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथमेश परमेश्वर पुटके | -- | -- | भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३ आणि ५०४ अन्वये | निर्दोष मुक्त | - | - |

## भाग–क

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

## अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| अभियोग पक्षाचे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्र. |
| सा. क्र.१ | श्री. शिवाजी तेजप्पा पुटके | फिर्यादी | निशाणी क्र.११ |

## ब. आरोपी तर्फे साक्षीदार

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## <u>अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी</u>

## अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | |

## ब. आरोपीचा पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | धातुचे कडे |

**: <u>न्या य नि र्ण य</u> :**

(दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी अधिघोषित)

आरोपीतांवर भारतीय दंड संहिताचे कलम ३२४, ३२३ आणि ५०४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**२.** सरकार पक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे आहे :-

दि.२९/०३/२०२२ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजताचे सुमारास फिर्यादी घरी झोपले असता त्यांचा पुतण्या प्रथमेश याने आवाज देवून खाली बोलविले. ते व त्यांचे पत्नी खाली गेले. आरोपी हा फिर्यादीला त्यांची रूम भाडयाने दिलेल्या मारूती ज्वेलर्स यास त्याचे भाडयाबाबत विचारपुस करू लागला. त्यावेळी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये बोलाचाली झाली. आरोपीने फिर्यादीला व फिर्यादीच्या पत्नीला शिवीगाळ केली. फिर्यादी हा आरोपीस शिवीगाळ करू नको असे बोलले. त्यामुळे आरोपीने त्याच्या हातातील कडे फिर्यादीच्या तोंडावर मारले व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या तोंडातून रक्त येवू लागले. त्यानंतर फिर्यादी व त्यांची पत्नी डॉक्टरांकडे गेली. त्यानंतर फिर्यादीने आरोपीविरूध्द पोलिस ठाणे तुर्भे येथे फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्यादनुसार गुन्हा नोंद क्र.८४/२०२२, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वये तुर्भे पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार पोलिस नाईक/३०४२ नितिन

कटके यांनी घटनास्थळ पंचनामा केला, मुद्देमाल पावती तयार केली, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने त्याच्याविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** मी आरोपींविरूध्द निशाणी क्र.०८ वर भा.द.वि. कलम ३२४, ३२३ आणि ५०४ या कलमांकरीता दोषारोप निश्चित केला. आरोपीतांनी आरोप अमान्य केले व खटल्याचे संपरिक्षेस सामोरे जाण्याची ईच्छा दर्शवली. आरोपीतांचे निवेदन निशाणी क्र.०९ वर नोंदविण्यात आले.

**५.** अभियोग पक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

**६.** उपरोक्त अभियोग पक्षाच्या कथनावरून तसेच अभिलेखावरील कागदपत्रावरून खालील मुदद् उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की यातील आरोपीताने दि.२९/०३/२०२२ रोजी रात्री ११.०० वाजताचे सुमारास घर क्र.३६ च्या समोर, डॉ. गोसावी दवाखान्याशेजारी, बाबा गल्ली, तुर्भे स्टोअर, नवी मुंबई या ठिकाणी फिर्यादी व त्यांची पत्नी वंदना यांस शिवीगाळ करून फिर्यादीच्या तोंडावर हातातील कढे मारून आपखुशीने दुखापत केली व त्याद्वारे भा. दंड संहिता १८६० चे कलम ३२४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? ... | नाही |

| | | |
|---|---|---|
| २. अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना ठोशा-बुक्क्यांनी मारहाण करून आपखुशीने दुखापत केली व त्याद्वारे भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम ३२३ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | ... | नाही |
| ३. अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी फिर्यादीला शिवीगाळ करुन त्यांचा जाणीवपूर्वक अपमान करुन सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले व त्याद्वारे तुम्ही माझे अधिकार क्षेत्रात भारतीय दंड विधान कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा केला आहे ? | ... | नाही |
| ४. काय आदेश ? | ... | अंतिम आदेश प्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करिता :</u>**

**७.** वरील सर्व मुद्दे एकाच घटनेशी संबंधीत असल्याने त्यांचा उहापोह एकत्रित करीत आहे.

**८.** सरकार पक्षातर्फे आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता केवळ एक साक्षीदार तपासण्यात आलेला आहे. शिवाजी तेजप्पा पुटके (साक्षीदार क्र.१ ) फिर्यादी असून त्यांचे साक्षीत असे आले आहे की दि. २९/०३/२०२२ रोजी ते घरासमोर थांबले होते तेव्हा त्यांना मागून कोणीतरी धक्का दिला. त्यामुळे ते खाली पडले. त्यांच्या ओठाला मार लागला. त्यांनी फिर्यादमधील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदार हा पुर्वीच्या जबाबास विसंगत साक्ष देत असल्याने सहायक सरकारी

वकीलांनी उलटतपासाच्या स्वरूपात प्रश्न विचारले. परंतु, सदर साक्षीदाराने सरकार पक्षास मदत होईल असे काही कथन उलटतपासाच्या स्वरूपात विचारलेल्या प्रश्नांना दिलेले नाही. त्यांनी त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे कथन केले आहे. त्यांनी संयुक्त तडजोड पुरशीर निशाणी क्र.१० अभिलेखावर दाखल केली आहे. सदर पुरशीसचे अवलोकन केले असता फिर्यादी व आरोपी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणात फिर्यादी हे जखमी व पिडीत असून त्यांनी स्वत:च्या केसला मदत केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणात काही शिल्लक राहात नाही. त्यांनी इतर साक्षीदार तपासायचे नाहीत असे कथन केलेले आहे. सदर साक्षीदार हा जखमी व प्रत्यक्षदर्शी असून त्यांनी स्वत:च्या केसला मदत केलेली नाही. फिर्यादी हे आरोपीचे काका असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सरकार पक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. सरकार पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा हा आरोपीविरूध्द आरोपी शाबीत करण्या इतका सबळ नाही. त्यामुळे घटनेच्या दिवशी आरोपींनी फिर्यादीला मारहाण व शिवीगाळ केल्याची बाब सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी प्रथमेश परमेश्वर पुटके यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीताचे बंधपत्र व जामीन कद्बा रद्द करण्यात येतो.

३. आरोपीताने फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ४३७-अ अन्वये आवश्यक असलेल्या जामीनाची पुर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल धातुचे कडे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

BHARAT SAMBHAJI GAIKWAD

Digitally signed by BHARAT SAMBHAJI GAIKWAD
Date: 2025.08.11 17:00:11 +0530

**सी.बी.डी. बेलापूर.**
**दिनांक : ११/०८/२०२५.**

**( भारत एस. गायकवाड )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**बेलापुर, नवी मुंबई.**